# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका


दै. पुण्यनगरी                दि.२८/१२/२०२५

# भिवंडीत मतदान पेटीसाठी सुरक्षित स्ट्राँगरूम

## निवडणूक कार्यालयात तयारी सुरू : सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची राहणार नजर

**। भिवंडी :** येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या भिवंडी-निजामपूर शहर महापालिकेच्या निवडणुकीसाठी पोलीस व महापालिका प्रशासन विभाग सज्ज झाले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

भिवंडी शहरातील विविध ठिकाणी मिळून सात क्षेत्रीय निवडणूक कार्यालये सुरू झाली असून राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त अनमोल सागर यांनी या सर्व कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.



निवडणुकीकरिता भिवंडीतील मिल्लतनगर येथील फरहान खान सभागृह (आर.ओ-१), भादवड येथील संपदा नाईक सभागृह (आर.ओ-२), भादवड संपदा नाईक सभागृह (आर.ओ-३), कामतघर येथील वऱ्हाळादेवी माता सभागृह (आर.ओ-४), अल्लाज शाह मोहम्मद सभागृह (आर.ओ-५), कोंबडपाडा येथील राजय्या गाजेंगी सभागृह (आर.ओ-६), राजय्या गाजेंगी सभागृह (आर.ओ-७) असे एकूण सात ठिकाणी क्षेत्रीय निवडणूक कार्यालये आहेत. निवडणुकीतील एकूण २३ प्रभागांपैकी आर.ओ- ३ व ४ यांच्या कार्यालयात प्रत्येकी ४ प्रभाग असून इतर पाच क्षेत्रीय निवडणूक कार्यालयात प्रत्येकी ३ प्रभागाचा समावेश आहे. या सर्व क्षेत्रीय निवडणूक कार्यालयाअंतर्गत असलेल्या एकूण ईव्हीएम मशीनच्या पेट्यांना लागणाऱ्या स्ट्राँग रूमसाठी स्वतंत्र सुरक्षित जागा तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. या स्ट्राँग रुम पूर्णपणे बंद असून एका बाजूने रूममध्ये जाण्यासाठी मार्ग आहे. तो मतदानाच्या पेट्या आत ठेवल्यानंतर सीलबंद करून अवतीभोवती पहारा ठेवण्यात येणार आहे.

### सिमेंटच्या भिंतीचे रूम


**१** मिल्लतनगर येथील फरहान सभागृहाच्या पहिल्या मजल्यावर मतदान झालेल्या ईव्हीएम मशीनच्या पेट्यांना लागणाऱ्या जागेसाठी सिमेंटच्या भिंतीचे रूम बनविण्याचे काम सुरू झाले आहे. इतर ठिकाणीही रूमच्या तीन बाजू बंद करण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे काम सुरू आहे.

**२** निवडणूक अधिकारी अनमोल सागर, निवडणूक निर्णय अधिकारी अमित सानप, शशिकांत गायकवाड, हर्षलता गेडाम, महेश हरिश्चंद्र, तहसीलदार अभिजित खोले यांच्यासह विविध अधिकाऱ्यांनी स्ट्राँग रूम व परिसराची पाहणी केली करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

---

दै. ठाणे वैभव

# मतदान पेट्यांसाठी स्ट्रॉंगरूम आणि मतमोजणी



**भिवंडी:** येत्या 15 जानेवारी रोजी होणाऱ्या भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी शहरातील विविध ठिकाणी मिळून सात क्षेत्रीय निवडणूक कार्यालये सुरु झाली असून राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त अनमोल सागर यांनी या सर्व कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार या प्रत्येक क्षेत्रीय निवडणूक कार्यालयात स्वतंत्र स्ट्राँग रुम बनविण्याचे काम सुरु झाले असून त्याच ठिकाणी मतमोजणी होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

भिवंडी-निजामपूर शहर महापालिका निवडणूक 25-26 करीता भिवंडीत मिल्लतनगर येथील फरहान खान सभागृह (आर.ओ-1),भादवड येथील संपदा नाईक सभागृह (आरओ-2), भादवड संपदा नाईक सभागृह (आरओ-3), कामतघर येथील वऱ्हाळादेवी माता सभागृह (आरओ-4),अल्लाज शाह मोहम्मद सभागृह (आर.ओ-5),कोंबडपाडा येथील राजय्या गाजेंगी सभागृह (आर.ओ-6), राजय्या गाजेंगी सभागृह (आर.ओ-7), असे एकूण सात ठिकाणी क्षेत्रीय निवडणूक कार्यालये आहेत. निवडणुकीतील एकूण 23 प्रभागापैकी आर.ओ- 3 व 4 यांच्या कार्यालयात प्रत्येकी 4 प्रभाग असून इतर पाच क्षेत्रीय निवडणूक कार्यालयात प्रत्येकी 3 प्रभागाचा समावेश आहे.

या सर्व क्षेत्रीय निवडणूक कार्यालया अंतर्गत असलेल्या एकूण ईव्हीएम मशीनच्या पेट्यांना लागणाऱ्या स्ट्रॉन्ग रुमसाठी स्वतंत्र जागा तयार करण्याची कारवाई सुरु केली असून या स्ट्रॉन्गरुमला तीन बाजूना पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. एका बाजूने रुममध्ये जाण्यासाठी मार्ग ठेवला असून तो मतदानाच्या पेट्या आत ठेवल्यानंतर सर्वांसमक्ष सीलबंद करुन स्ट्राँग रुमच्या अवतीभोवती कडक पहारा ठेवण्यात येणार आहे.,अशी माहिती सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली. त्यापैकी मिल्लतनगर येथील फरहान सभागृहाच्या पहिल्या मजल्यावर मतदान झालेल्या ईव्हीएम मशीनच्या पेट्यांना लागणाऱ्या जागेसाठी सिमेंटच्या भिंतीचे रुम बनविण्याचे काम सुरु झाले असून इतर ठिकाणी देखील रुमच्या तीन बाजू बंद करण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे काम सुरु केले आहे.

Scanned with OKEN Scanner


दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

# भिवंडीतील निवडणूक कार्यालयात स्ट्रॉंगरूम तयार करण्याची धावपळ

## मतपेट्यांच्या सुरक्षितेवर सीसीटीव्ही कॅमेरेची नजर...

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी (शरद भसाळे)**

येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी पोलीस व महापालिका प्रशासन विभाग सुसज्ज झाले असुन निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे.भिवंडी शहरातील विविध ठिकाणी मिळून आठ क्षेत्रीय निवडणूक कार्यालये सुरु झाली असून राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त अनमोल सागर यांनी या सर्व कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार या प्रत्येक क्षेत्रीय निवडणूक कार्यालयात सुरक्षित असा स्वतंत्र स्ट्रॉंग रुम बनविण्याचे धावपळ काम जोमात सुरु झाले असुन त्याच ठिकाणी मतमोजणी होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



भिवंडी शहर महानगर पालिका निवडणूकी करीता भिवंडी शहरातील मिल्लतनगर येथील फरहान खान सभागृह (आर.ओ-१),भादवड येथील संपदा नाईक सभागृह (आर.ओ-२),भादवड संपदा नाईक सभागृह (आर.ओ-३), कामतघर येथील वऱ्हाळादेवी माता सभागृह (आर.ओ-४), अल्लाज शाह मोहम्मद सभागृह (आर.ओ-५),कॉंवडपाडा येथील राजय्या गाजेंगी सभागृह(आर.ओ-६), राजय्या गाजेंगी सभागृह (आर.ओ-७), असे एकूण सात ठिकाणी क्षेत्रीय निवडणूक कार्यालये आहेत. निवडणुकीतील एकूण २३ प्रभागापैकी आर.ओ- ३ व ४ यांच्या कार्यालयात प्रत्येकी ४ प्रभाग असून इतर पाच क्षेत्रीय निवडणूक कार्यालयात प्रत्येकी ३ प्रभागाचा समावेश आहे. या सर्व क्षेत्रीय निवडणूक कार्यालया अंतर्गत असलेल्या एकूण ईव्हीएम मशीनच्या पेट्यांना लागणाऱ्या स्ट्रॉंग रुम साठी स्वतंत्र सुरक्षित जागा तयार करण्याचे काम सुरु झाले असून या स्ट्रॉंग

रुमला तीन बाजूना पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. एका बाजूने रुममध्ये जाण्यासाठी मार्ग ठेवला असून तो मतदानाच्या पेट्या आत ठेवल्यानंतर सर्वांसमक्ष सीलबंद करुन स्ट्रॉंग रुमच्या अवतीभोवती कडक पहारा व सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत.अशी माहिती सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.त्यापैकी मिल्लतनगर येथील फरहान सभागृहाच्या पहिल्या मजल्यावर मतदान झालेल्या ईव्हीएम मशीनच्या पेट्यांना लागणाऱ्या जागेसाठी सिमेंटच्या भिंतीचे रुम बनविण्याचे काम सुरु झाले असुन इतर ठिकाणी देखील रुमच्या तीन बाजू बंद करण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे काम सुरु केले आहे.निवडणूक अधिकारी अनमोल सागर, निवडणूक निर्णय अधिकारी अमित सानप, शशिकांत गायकवाड,हर्षलता गेडाम, महेश हरिश्चंद्र तहसीलदार अभिजित खोले यांच्यासह विविध अधिकाऱ्यांनी स्ट्रॉंग रुम व परिसराची पाहणी केली करुन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना नैतिक सुचना दिल्या आहेत.

१५ जानेवारी २०२६ रोजी मतदान झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी शुक्रवारी सकाळी १० वाजल्यापासून त्याच क्षेत्रीय कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे. हि मतमोजणी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी विजयी उमेदवारांची घोषणा करणार आहे.सध्या शहरातील सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची सात क्षेत्रीय कार्यालये निवडणूक घेण्यासाठी सज्ज झाली आहेत. तर प्रत्येक निवडणूक कार्यालया बाहेर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.


दैनिक
# महाराष्ट्र जनमुद्रा

# भिवंडीतील निवडणूक कार्यालयात मतदान पेटीसाठी सुरक्षित स्ट्रॉंगरूम तयार करण्याची धावपळ सुरू

## सीसीटीव्ही कॅमेरेची नजर...

**भिवंडी (शरद भसाळे)** : येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी पोलीस व महापालिका प्रशासन विभाग सुसज्ज झाले असुन निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे.भिवंडी शहरातील विविध ठिकाणी मिळून सात क्षेत्रीय निवडणूक कार्यालये सुरु झाली असून राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त अनमोल सागर यांनी या सर्व कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार या प्रत्येक क्षेत्रीय निवडणूक कार्यालयात सुरक्षित असा स्वतंत्र स्ट्रॅंग रूम बनविण्याचे धावपळ काम जोमात सुरु झाले असून त्याच ठिकाणी मतमोजणी होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

भिवंडी शहर महानगर पालिका निवडणूकी करीता भिवंडी शहरातील मिल्लतनगर येथील फरहान खान सभागृह (आर.ओ-१),भादवड येथील संपदा नाईक



सभागृह (आर.ओ-२), भादवड संपदा नाईक सभागृह (आर.ओ-३), कामतघर येथील वऱ्हाळादेवी माता सभागृह (आर.ओ-४), अल्लाज शाह मोहम्मद सभागृह (आर.ओ-५),कोंबडपाडा येथील राजय्या गाजेंगी सभागृह (आर.ओ-६), राजय्या गाजेंगी सभागृह (आर.ओ-७), असे एकूण सात ठिकाणी क्षेत्रीय निवडणूक कार्यालये आहेत. निवडणुकीतील एकूण २३ प्रभागापैकी आर.ओ-३ व ४ यांच्या कार्यालयात प्रत्येकी ४ प्रभाग असून इतर पाच क्षेत्रीय निवडणूक कार्यालयात प्रत्येकी ३ प्रभागाचा समावेश आहे. या सर्व क्षेत्रीय निवडणूक कार्यालया अंतर्गत असलेल्या एकूण ईव्हीएम मशीनच्या पेट्यांना लागणाऱ्या स्ट्रॉंग रूम साठी स्वतंत्र सुरक्षित जागा तयार करण्याचे काम सुरु झाले असून या स्ट्रॉंग रूमला तीन बाजूना पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. एका बाजूने रूममध्ये जाण्यासाठी मार्ग ठेवला असून तो मतदानाच्या पेट्या आत ठेवल्यानंतर सर्वासमक्ष सीलबंद करून स्ट्रॅंग रूमच्या अवतीभोवती कडक पहारा व सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत.अशी माहिती सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली. त्यापैकी मिल्लतनगर येथील फरहान सभागृहाच्या पहिल्या मजल्यावर मतदान झालेल्या ईव्हीएम मशीनच्या पेट्यांना लागणाऱ्या जागेसाठी सिमेंटच्या भिंतीचे रूम बनविण्याचे काम सुरु झाले असून इतर ठिकाणी देखील रूमच्या तीन बाजू बंद करण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे काम सुरु केले आहे. निवडणूक अधिकारी अनमोल सागर, निवडणूक निर्णय अधिकारी अमित सानप, शशिकांत गायकवाड, हर्षलता गेडाम, महेश हरिश्चंद्र तहसीलदार अभिजित खोले याच्यासह विविध अधिकाऱ्यांनी स्ट्रॅंग रूम व परिसराची पाहणी केली करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मौलिक सुचना दिल्या आहेत.

१५ जानेवारी २०२६ रोजी मतदान झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी शुक्रवारी सकाळी १० वाजल्यापासून त्याच क्षेत्रीय कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे. हि मतमोजणी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी विजयी उमेदवारांची घोषणा करणार आहे.

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दि.२८/१२/२०२५

दै० पुण्यनगरी

## शाळकरी मुलांकडून भिवंडीत मतदान जनजागृती

**। भिवंडी** : भिवंडी शहर महापालिका सार्वत्रिक निवडणूक सुरळीतपणे पार पडावी यासाठी पोलीस व महापालिका प्रशासन सुसज्ज पद्धतीने कामकाज करीत आहेत. निवडणुकीच्या निमित्ताने मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी पालिकेच्या स्वीप कक्षामार्फत मतदान जनजागृती विशेष मोहीम सुरू करण्यात आली असून त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

भिवंडी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अनमोल सागर, अतिरिक्त आयुक्त नयना ससाणे व स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी श्रीकांत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक नोडल अधिकारी कल्पना तळपाडे व राहुल नाडेकर यांच्या उपस्थितीत शहरातील टेमघर



येथील पालिका शाळा क्रमांक ४४ च्या विद्यार्थ्यांनी टेमघर गावामध्ये गल्लीबोळातून रॅली काढून परिसरातील नागरिकांमध्ये जनजागृती केली. १५ जानेवारी रोजी मतदानाला चला, असे नारे देऊन या विद्यार्थ्यांना नागरिकांना आवाहन केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका प्राजक्ता प्रदीप परब, शिक्षक प्रमोद सूर्यवंशी, सत्यनारायण गोलापेल्ली, सुनील बोंबेरे, राजेंद्र साळवे, संजय गोदके यांनी विशेष मेहनत घेतली.

दै० हमारा महानगर

## भिवंडी में स्वीप कक्षा के माध्यम से मतदान जागरूकता अभियान

**भिवंडी।** भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका की सार्वत्रिक चुनाव प्रक्रिया 2025-26 के तहत मतदाताओं को जागरूक करने के उद्देश्य से स्वीप कक्षा के माध्यम से व्यापक जनजागरण अभियान चलाया गया। यह कार्यक्रम मनपा आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त नयना ससाणे के मार्गदर्शन में और स्वीप कक्षा के नोडल अधिकारी श्रीकांत परदेशी के निर्देशन में आयोजित किया गया। इस अभियान के तहत मनपा स्कूल क्रमांक 68, नविवस्ती के छात्र-छात्राओं द्वारा नविवस्ती से अप्सरा टॉकीज तक जागरूकता रैली निकाली गई। रैली के दौरान चौक-चौराहों पर नागरिकों से आगामी 15 जनवरी 2026 को मतदान कर लोकतंत्र को मजबूत करने की अपील की गई।

Scanned with OKEN Scanner

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दि. २८/१२/२०२५

दै. पुढारी

# भिवंडीत माजी महापौरांविरोधात आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल

**भिवंडी : पुढारी वृत्तसेवा**

भिवंडी महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली. परंतु अजून निवडणूक प्रचाराची रंगत चढणे बाकी असतानाच भिवंडीत आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी माजी महापौर विलास पाटील व इतर चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## निवडणूक प्रक्रिये दरम्यान भिवंडीत पहिला गुन्हा

निवडणूक प्रक्रिये दरम्यान भिवंडीत दाखल झालेला हा पहिला गुन्हा असून अजून पुढील काळात अनेक वादंगाचे प्रसंग प्रभाग क्रमांक एक सह अनेक भागात घडण्याची शक्यता वर्तविण्यात येणार असल्याने निवडणूक यंत्रणेसह पोलिस प्रशासनास सतर्क राहण्याची गरज असणार आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शनिवारी सायंकाळी सात वाजता म्हाडा कॉलनी या भागात खडी टाकून रस्ता बनवण्याचे काम सुरु होते. निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ६ अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मधील संगम पाडा रोड परिसरात हे काम सुरू असल्याबाबत तक्रार निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे आल्यानंतर भरारी पथक क्रमांक ५ मधील कर्मचारी बिट निरीक्षक हनुमान म्हात्रे व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी तेथे रस्ता बनविण्याचे काम करणारे इरफान हबीब अन्सारी व डंपर चालक जाहिरुद्दीन जमीर अन्सारी यांना काम कोण करीत आहे याबाबत विचारणा केली. त्यांनी तेथे उभ्या असलेल्या अब्दुल रज्जाक बेग या व्यक्ती कडे बोट दाखवून त्याने काम करण्यास सांगितले असल्याचे भरारी पथकासमोर सांगितले.

त्याच्या कडे चौकशी केली असता त्याने माजी महापौर विलास पाटील व त्यांचा मुलगा मयुरेश यांनी या भागात रस्ता बनवण्याचे काम करण्यास सांगितल्यानचे स्पष्ट केले. आचारसंहिता भरारी पथकाने हे काम बंद पाडून भरारी पथक प्रमुख हनुमान म्हात्रे यांनी निजामपूर पोलिस ठाण्यात विलास पाटील, मयुरेश पाटील यांसह इरफान हबीब अन्सारी व जाहिरुद्दीन जमीर अन्सारी अशा चार जणांनी रस्त्याचे काम करून मतदार यांना मतदान करावे या उद्देशाने निवडणुक आयोगाची परवानगी न घेता आचार संहिता दरम्यान सार्वजनिक रस्ता तयार करण्याचा प्रयत्न करीत आचारसंहितेचा भंग केल्याची तक्रार दिल्याने निजामपूर पोलिस ठाण्यात चार जणांविरोधात भा.न्या.संहिता कलम २२३,२८५,लोकप्रतिनिधी अधिनियम कलम १२३ सह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दै. सकाळ

# आचारसंहिता भंगाची तक्रार

## भिवंडीत माजी महापौरांसह चार जणांवर गुन्हा

भिवंडी, ता. २८ (वार्ताहर) : आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी माजी महापौर विलास पाटील आणि इतर चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शनिवारी (ता. २७) म्हाडा कॉलनी या भागात खडी टाकून रस्ता बनवण्याचे काम सुरू होते. निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ६ अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मधील संगमपाडा रोड परिसरात हे काम सुरू असल्याबाबत तक्रार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आल्यानंतर भरारी पथक क्रमांक ५ मधील कर्मचारी बिट निरीक्षक हनुमान म्हात्रे आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्या वेळी तेथे रस्ता बनविण्याचे काम करणारे इरफान हबीब अन्सारी व डंपरचालक जाहिरुद्दीन जमीर अन्सारी यांना काम कोण करीत आहे, याबाबत विचारणा केली. त्यांनी तेथे उभ्या असलेल्या अब्दुल रज्जाक बेग या व्यक्तीकडे बोट दाखवून त्याने काम करण्यास सांगितले असल्याचे भरारी पथकासमोर सांगितले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने माजी महापौर विलास पाटील आणि त्यांचा मुलगा मयूरेश यांनी या भागात रस्ता बनवण्याचे काम करण्यास सांगितल्याचे स्पष्ट केले. आचारसंहिता भरारी पथकाने हे काम बंद पाडून भरारी पथकप्रमुख हनुमान म्हात्रे यांनी निजामपूर पोलिस ठाण्यात विलास पाटील, मयूरेश पाटील यांच्यासह इरफान हबीब अन्सारी व जाहिरुद्दीन जमीर अन्सारी या चार जणांनी रस्त्याचे काम करून मतदारांना मतदान करावे, या उद्देशाने निवडणूक आयोगाची परवानगी न घेता आचारसंहितेचा भंग केल्याची तक्रार दिली.

Scanned with OKEN Scanner

दि० २८/१२/२०२४

दै० दैनिक भास्कर

आचार संहिता का उल्लंघन

## भिवंडी के पूर्व महापौर सहित 5 लोगों पर केस दर्ज

भास्कर संवाददाता | भिवंडी. मनपा प्रशासन ने पूर्व महापौर सहित पांच लोगों पर आचार संहिता उल्लंघन का मामला दर्ज निजामपुर पुलिस स्टेशन में करवाया है। आरोप है कि इन पांचों ने बिना किसी इजाजत मतदाताओं को रिझाने के लिए सड़क निर्माण का कार्य शुरू किया। पुलिस के मुताबिक, म्हाडा कॉलोनी में आचार संहिता उल्लंघन कर सड़क निर्माण किया जा रहा था। सूचना मिलते ही मनपा सहायक आयुक्त तत्काल मौके वारदात पर पहुंच कर उचित कार्रवाई का उन्हें आदेश दिया। पूर्व महापौर विलास पाटील, उनके पुत्र मयूरेश पाटील, इरफान हबीब अंसारी जहीरूद्दीन अंसारी, अब्दुल रज्जाक बेग सहित पांच लोगों पर मामला दर्ज हुआ है। पुलिस मामले की जांच शुरू कर रही है।

दै० सकाळ

## आचारसंहिता भंग; माजी महापौरांवर गुन्हा

**भिवंडी** : आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी माजी महापौर विलास पाटील व इतर चारजणांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला. म्हाडा कॉलनी या भागात खडी टाकून रस्ता बनवण्याचे काम सुरू होते. कर्मचारी बीट निरीक्षक हनुमान म्हात्रे व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून कारवाई केली.

Scanned with OKEN Scanner

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दि.२८/१२/२०२४

दै० मुंबई इन्कलाब

# بھیونڈی: انتخابی تیاریوں میں بڑی کوتاہی، تربیتی کیمپ سے ہزار سے زائد ملازمین غائب!


خالد عبدالقیوم انصاری

**بھیونڈی:** میونسپل کارپوریشن کے آئندہ انتخابات سے قبل انتخابی تیاریوں میں سنگین لاپروائی سامنے آئی ہے، جہاں لازمی تربیتی کیمپ سے ایک ہزار ۶ ملازمین کی غیر حاضری نے انتظامیہ کو تشویش میں بتلا کر دیا ہے، جس پر کمشنر انمول ساگر نے سخت کارروائی کا عندیہ دیا ہے۔

انتخابی عمل کی کامیاب انجام دہی کیلئے ۲۵ اور ۲۶ دسمبر کو ۲ روزہ تربیتی کیمپ کا انعقاد کیا گیا تھا، جس میں پولنگ کے عملی مراحل، ای وی ایم کا درست استعمال، ووٹر لسٹ کی جانچ، پولنگ اسٹیشن کا نظم و نسق اور امن و امان سے متعلق رہنمائی دی جانی تھی۔ تاہم اسٹیبلشمنٹ ڈپارٹمنٹ کے مطابق انتخابی فرائض کیلئے نامزد تقریباً ۴۵۰۰ ملازمین میں سے ایک ہزار ۶ اہلکار تربیت میں شریک نہیں ہوئے۔

ذرائع کے مطابق غیر حاضر ملازمین میں واڈا پنچایت سمیتی کے اساتذہ اور دیگر تقریباً ۴۰۰ اہلکار شامل ہیں۔ بتایا جارہا ہے کہ انہیں ایک ہی وقت میں وسئی۔ ویرار میونسپل کارپوریشن کی جانب سے بھی انتخابی ڈیوٹی کے احکامات موصول ہوئے، جس کے باعث یہ ملازمین بھیونڈی کے تربیتی کیمپ میں حاضر نہ ہو سکے۔ اس کے علاوہ شاہ پور اور بھیونڈی پنچایت سمیتی کے علاوہ میونسپل حدود سے تعلق رکھنے والے متعدد اساتذہ و ملازمین بھی غیر حاضر رہے، جس سے غیر حاضری کا دائرہ مزید وسیع ہو گیا۔

میونسپل حکام کے مطابق اس پیمانے پر غیر حاضری نے انتخابی تیاریوں کو براہِ راست متاثر کیا ہے کیونکہ بغیر تربیت یافتہ عملے کے شفاف اور منظم پولنگ ممکن نہیں۔ اسی پس منظر میں میونسپل کمشنر انمول ساگر نے تمام غیر حاضر ملازمین کو وجہ بتاؤ نوٹس جاری کرتے ہوئے سخت موقف اختیار کیا ہے۔ کمشنر نے واضح کیا ہے کہ غیر حاضری کو محض انتظامی کوتاہی نہیں بلکہ انتخابی ذمہ داریوں سے غفلت سمجھا جائے گا۔



تربیتی کیمپ میں ای وی ایم کا درست استعمال اور ووٹر لسٹ کی جانچ کے تعلق سے ٹریننگ دی جاتی ہے۔ (فائل فوٹو)

اس حوالے سے ڈپٹی میونسپل کمشنر (ہیڈکوارٹر) وکرم دراڑے نے بتایا کہ غیر حاضر ملازمین کیلئے ۳۰ دسمبر کو خصوصی تربیتی کیمپ منعقد کیا جارہا ہے تاکہ انتخابی عمل میں کسی قسم کی رکاوٹ نہ آئے۔ اس سے قبل زونل افسران کی تربیت مکمل کی جائے گی۔ تاہم اگر خصوصی تربیت میں بھی کوئی ملازم غیر حاضر پایا گیا تو اس کے خلاف پولیس میں ایف آئی آر درج کرانے سمیت سخت قانونی کارروائی عمل میں لائی جائے گی۔

اسٹیبلشمنٹ ڈپارٹمنٹ کے ایک سینئر افسر کے مطابق غیر حاضر افراد میں کارپوریشن کے چپراسی، اساتذہ اور دیگر مختلف زمروں کے ملازمین شامل ہیں جس سے یہ واضح ہوتا ہے کہ غیر حاضری کسی ایک شعبے تک محدود نہیں بلکہ ایک وسیع انتظامی مسئلہ کی شکل اختیار کر چکی ہے۔ میونسپل انتظامیہ نے دوٹوک انداز میں کہا ہے کہ انتخابات جیسے حساس اور آئینی عمل میں غیر حاضری یا لاپروائی کو کسی صورت قبول نہیں کیا جائے گا۔ انتظامیہ کا کہنا ہے کہ تمام اہلکاروں کی بروقت حاضری اور مکمل تربیت ہی منصفانہ، شفاف اور پُرامن انتخابات کی ضمانت ہے اور اسی مقصد کے تحت غیر حاضری کے خلاف سخت ترین اقدامات کئے جارہے ہیں۔